**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-१९२६/प्र.क्र.१८/१३-स**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

दिनांक : १३ मार्च, २०२६

<u>वाचा :</u>

१. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन अधिसूचना, क्रमांक : सीएसएल-२०१३/प्र.क्र.१२४/१५-स, दिनांक ३० मार्च, २०१३.

२. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक : सववि-३११३/प्र.क्र. ७२/ आस्था-१, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३.

३. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक : सीएसएल-२०१४/ प्र.क्र.८७/ १३स, दिनांक ०५ मार्च, २०१५.

४. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक : सनिनि-१५२५/प्र.क्र.१०६/ १३-स, दिनांक १० सप्टेंबर, २०२५.

५. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे जा.क्र. रासनिप्रा/ कक्ष-१६/ आस्था/ अस्थायी पदे /मुदतवाढ/१७१/२०२६, दिनांक १२.०१.२०२६ रोजीचे पत्र.

६. वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:- पदनि २०१६/ प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक २८.०२.२०२६.

**<u>प्रस्तावना</u> :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७३ कब अन्वये राज्य निवडणूक आयोगाच्या धर्तीवर दिनांक ३० मार्च, २०१३ रोजीच्या अधिसूचनेद्वारे राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी स्वतंत्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण घटित करण्यात आले आहे.

**०२.** मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्च स्तरीय समितीच्या बैठकीतील निर्णयाच्या अनुषंगाने, राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी घटित केलेल्या राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणासाठी मा. मंत्रिमंडळाने मान्यता दिलेल्या ४७ पदांमधून ३ पदे वगळून उर्वरित ४४ पदे निर्माण करण्यास उपरोक्त वाचा क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. तसेच, वाचा क्रमांक ४ येथील शासन निर्णयानुसार ४४ अस्थायी पदे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत चालू ठेवण्यास मंजूरी देण्यात आली आहे. सदर मुदत दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत असल्याने सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सदर ४४ पदे चालू ठेवण्यास मान्यता देण्याची विनंती वाचा क्रमांक ५ येथील पत्रान्वये केली असून त्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांच्या दिनांक १२ जानेवारी, २०२६ रोजींच्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील खालील नमूद तक्त्यातील ४४ अस्थायी पदांना **दिनांक ०१.०३.२०२६ ते दिनांक ३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यास शासन मंजूरी देत आहे.**

| अ.क्र. | पदनाम | मंजूर पदांची संख्या |
|---|---|---|
| | **राजपत्रित** | |
| १ | आयुक्त | १ |
| २ | सचिव | १ |
| ३ | सह सहकारी निवडणूक आयुक्त | २ |
| ४ | उप सहकारी निवडणूक आयुक्त | २ |
| ५ | विधी सल्लागार | १ |
| ६ | सहाय्यक सहकारी निवडणूक आयुक्त | ६ |
| ७ | लेखा अधिकारी तथा रोखलेखापाल | १ |
| | **अराजपत्रित** | |
| ८ | Software support Engineer | १ |
| ९ | उच्च श्रेणी लघुलेखक | २ |
| १० | सहाय्यक प्रशासकीय अधिकारी | १२ |
| ११ | लिपिक-टंकलेखक | १२ |
| | **वर्ग-४** | |
| १२ | शिपाई | ३ |
| **एकूण** | | **४४** |

**०२.** वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे मुदतवाढ देण्यात आलेल्या पदांपैकी आयुक्त १ पद व प्रतिनियुक्तीवरील १३ पदांचे वेतन व भत्ते या बाबींवर होणारा खर्च तसेच कंत्राटी तत्वावर सेवानिवृत्तीमधील १४ पदांचे व बाह्यस्त्रोतामधील १६ पदांचे असे एकूण ४४ पदांचे मासिक पारिश्रमिक याबाबींवर होणारा खर्च मागणी क्र. व्ही-२, २०७०-इतर प्रशासनिक सेवा (००)- ००१- संचालन व प्रशासन (०१) संचालन व प्रशासन (०१) (०१)- राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण (अनिवार्य) (२०७० अ ०५८) सेवा या बाबीमधून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मंजूर आर्थिक अनुदानातून भागविण्यात येईल.

**०३.** सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: पदनि २०१६/ प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक २८.०२.२०२६ अन्वये अस्थायी पदांना मुदतवाढ देण्यासाठी प्रशासकीय विभागांना अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०३१३१६१०४४१५०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

TEJAL RAMESHRAO PARDE

Digitally signed by TEJAL RAMESHRAO PARDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=019d779a48258636496c1fec0492fd7daa52f3f2c32979802 8660b47fed6130a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=89128237A4F41B9735DD61762BBCE33E4A0AF82C2 F7EAB2825CB61E62611D4AB, cn=TEJAL RAMESHRAO PARDE
Date: 2026.03.13 16:11:57 +05'30'

**( तेजल र. पारडे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.
३. महालेखापाल १ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
४. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.

प्रत,

१. प्रधान सचिव (सहकार व पणन) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
२. निवडनस्ती-१३स.